**जिल्हा परिषदेतील "गट-क" व "गट-ड" रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्याकरिता विशेष मोहिमेसंदर्भात वेळापत्रक व सूचना.**

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्र. एपिटी-२००७ / प्रक्र- ३०३ /आस्थापना - ८,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक २२ एप्रिल २००८.

संदर्भ :

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-२००७/प्रक्र-१५९/०७/१२, दिनांक १-१०-२००७.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-२००७/प्रक्र-१५९/०७/१२, दिनांक १७-११-२००७.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.प्रानिमं-२००७/प्रक्र-४६/०७/१३-अ, दिनांक १९-१०-२००७

४) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक, क्र.एपिटी-२००७/प्रक्र-३०३/आस्था.-८, दिनांक २८-१-२००८.

५) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक, क्र.एपिटी-२००७/प्रक्र-३०३(अ)/आस्था.-८, दिनांक १९-३-२००८.

६) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक, क्र.एपिटी-२००७/प्रक्र-३०३/आस्था.-८, दिनांक ८-४-२००८.

**<u>शासन निर्णयः</u>**

याबाबत शासनाचे पुढीलप्रमाणे सुधारित आदेश आहेत :-

१) दिनांक २८-१-२००८ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट-अ ऐवजी सुधारित परिशिष्ट - "अ" सोबत जोडले असून त्याप्रमाणे लेखी परीक्षेची प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

२) उपरोक्त परीक्षेसंदर्भात उमेदवारांच्या अर्जाबाबत संगणकीकृत डाटा तयार करणे, उमेदवारांना प्रवेशपत्र देणे, उत्तरपत्रिकांची संगणकाद्वारे छाननी करुन मुलाखतीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९-१०-२००७ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद- ७ मध्ये विहित केलेल्या प्रमाणानुसार यादी तयार करण्याची प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) तर्फे पार पाडण्यात येणार आहे.

३) केवळ लेखी परीक्षेच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करणे तसेच विहित पध्दतीनुसार लेखी परीक्षेनंतर मुलाखतीची संपूर्ण प्रक्रिया पार पाडून मुलाखतीचे व लेखी परीक्षेच्या गुणांची एकत्रित अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील निवड मंडळाची राहील.

४)	याबाबतच्या उमेदवारांच्या निवडसूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९-१०-२००७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ८ नुसार राहील.

५)	ज्या दिवशी लेखी परीक्षा होईल त्यानंतर ५ दिवसांत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) मुलाखत प्रक्रिया पूर्ण करुन पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात यावी.

६)	उपरोक्त परीक्षेसाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या नांवे काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी. द्वारे फी स्वीकारण्यास परवानगी देण्यात येत आहे. दिनांक १९-१०-२००७ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद - ४ नुसार कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक या लिपिकवर्गीय पदांच्या परिक्षेकरिता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १९-१०-२००७ अन्वये खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून प्रति उमेदवार रु.१५०/- व मागास प्रवर्गातील उमेदवाराकडून प्रति उमेदवार रु.७५/- प्रमाणे वर उल्लेख केल्यानुसार डी.डी. स्वरुपात शुल्क घेण्यात यावे. तसेच उर्वरित सर्व परिक्षेकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकडून रु.२००/- व मागास प्रवर्गातील उमेदवाराकडून रु.१००/- प्रमाणे शुल्क घेण्यात यावे. मात्र विहित फी मधून जिल्हा परिषदेने परीक्षेचा सर्व खर्च भागविणे आवश्यक आहे व त्यासाठी शासनातर्फे कोणताही निधी मंजूर करण्यात येणार नाही.

७)	याप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) ने एकत्रित केलेले डी.डी. स्वरुपातील सर्व परीक्षा शुल्क उमेदवारांच्या मूळ अर्जासह, संबंधित जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करावे व जिल्हा परिषदेने त्याची पोच द्यावी. तसेच परीक्षा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर (मुलाखत प्रक्रिया वगळून) तात्काळ १५ दिवसांच्या आंत महाराष्ट्र ज्ञान महामंडळाला (MKCL) प्रति उमेदवाराकडून प्रति रु.१२५/- प्रमाणे (मागासवर्गीय उमेदवारासह) रक्कम सेवा शुल्क म्हणून अदा करण्यात यावे व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

८)	उपरोक्त परीक्षेसाठी विभागीय आयुक्त यांनी संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयानुसार प्रश्नपत्रिका A, B, C, D अशा सिरीजमध्ये तयार करुन त्यानुसार बैठक व्यवस्था निश्चित करुन व संनियंत्रण करुन परीक्षा पार पाडाव्या.

९)	विभागीय आयुक्त यांनी याबाबत परिक्षेची प्रक्रिया दक्षतापूर्वक व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदांना योग्य ते मार्गदर्शन उदा.- मोबाईल न बाळगणे, बैठक व्यवस्था इ. करावे.

१०)	नियुक्ती आदेश देण्याची प्रक्रिया जिल्हा परिषदेने तात्काळ पूर्ण करावी.

११)  या परीक्षेसाठी नेमण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचारी, निरीक्षक व संबंधितांना विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एपिटी-२००७/प्रक्र-१५१/आस्था.-८, दिनांक ११ मे २००७ मध्ये विहित केल्याप्रमाणे मानधन देण्यात यावे.

१२)  या परीक्षेसंबंधात कोणत्याही स्वरुपात तक्रारी प्राप्त झाल्यास विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अखत्यारितील अधिकाऱ्यांमार्फत परीक्षेचे संनियंत्रण करुन तक्रारीचा तात्काळ निपटारा करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षतापूर्वक परीक्षा प्रक्रिया पार पाडून त्याचा अहवाल विभागीय आयुक्त यांना पाठवावा.

१३)  याबाबत महाराष्ट्र ज्ञान महामंडळाबरोबर सामंजस्याचा करार (MOU) सचिव, ग्राम विकास विभाग हे करतील.

२.  शासनाच्या वेबसाईट **www.maharashtra.gov.in** वर संगणक संकेतांक **२००८०४२२१६४२५८००१** अन्वये हे परिपत्रक उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्रकाश हिर्लेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
४) शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र पुणे.
५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
६) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
७) महालेखापाल, महाराष्ट्र ( लेखा परिक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
८) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी.
९) सर्व जिल्हा सेवायोजन व स्वयंरोजगार मार्गदर्शक अधिकारी.
१०) संबंधित जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२) सामान्य प्रशासन विभाग / वित्त विभाग / आदिवासी विकास विभाग / सार्वजनिक आरोग्य विभाग / सामाजिक न्याय विभाग / रोजगार व स्वयंरोजगार विभाग / सार्वजनिक बांधकामविभाग / कृषि व पदुम विभाग / जलसंपदा विभाग / शालेय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सर्व सह सचिव / उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व कार्यासन.
१४) एम.के.सी.एल. पहीला मजला, डि.व्ही.ई.टी बिल्डींग, एलफिस्टन टेक्नीकल हायस्कुल कॅम्प, मुंबई ४०० ००१
१६) निवड नस्ती / आस्था-८, ग्रा.वि.व ज.स.वि., मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**शासन निर्णय, ग्राम विकास विभाग,क्र. एपिटी-२००७/प्र.क्र.-३०३/आस्था.-८, दिनांक २२ एप्रिल २००८ सोबतचे सहपत्र.**

**परिशिष्ट - अ**

| अ.क्र. | वार व दिनांक | वेळ | पदनाम | वेळ | पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १) | चौथा रविवार दिनांक २२ जून २००८ | सकाळी १०.०० ते ११.३० | कनिष्ठ अभियंता / कृषि अधिकारी / विस्तार अधिकारी (कृषि ) प्रयोगशाळा तंत्रज्ञ वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | दुपारी २.०० ते ३.०० | जोडारी / कनिष्ठ यांत्रिकी / तारतंत्री |
| | | | | दुपारी २.०० ते ३.३० | पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल विकास सेवा योजना)/ विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रेणी -२ आरोग्य सेवक( पुरुष ) / आरोग्य सेवक ( महिला ) कनिष्ठ आरेखक |
| २) | चौथा शनिवार दिनांक २८ जून, २००८ | सकाळी १०.०० ते ११.३० | कंत्राटी ग्राम सेवक/ औषध निर्माता वरिष्ठ सहायक (लिपिक) | दुपारी २.०० ते ३.३० | विस्तार अधिकारी (पंचायत ) / आरेखक /स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (समावेशनाची पदे वगळून) कनिष्ठ सहायक (लिपिक)/ (लेखा) |
| ३) | पाचवा रविवार दिनांक २९ जून २००८ | सकाळी १०.०० ते ११.३० | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) / लघुलेखक | दुपारी २.०० ते ३.३० | कनिष्ठ लेखा अधिकारी परिचर / पट्टीबंधक आरोग्य पर्यवेक्षक |

याबाबत जाहिरात देण्यापासून ते कट ऑफ लिस्ट जाहीर करणे या सर्व प्रक्रियेकरिता वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील :-

एक - वृत्तपत्रात जाहिराती अ.क्र. १, २, व ३ करिता दि. १-५-२००८ ते दि. ५-५-२००८ पर्यन्त देण्यात याव्यात.

दोन - अर्जाच्या विक्रीकरिता (अ) अ.क्र. १ साठी दि. १-५-२००८ ते दि. १३-६-२००८
(ब) अ.क्र. २ व ३ यासाठी दि. १-५-२००८ ते दि. १५-६-२००८

तीन - अर्ज स्वीकारण्याच्या दि. १-६-२००८ पासून
(अ) अ.क्र.१ बाबत दि. १३-६-२००८ पर्यन्त
(ब) अ.क्र. २ च ३ बाबत दि.१५-६-२००८ पर्यन्त

चार - जिल्हा परिषदेतर्फे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने (MKCL) केलेले डाटा अपलोडींग विचारात घेऊन परीक्षा केंद्र निश्चित करुन महाराष्ट्र ज्ञान महामंडळाला कळविणे.

(अ) अ.क्र. १ बाबत दि. १६-६-२००८ रोजी
(ब) अ.क्र. २ व ३ बाबत दि.२०-६-२००८ रोजी

पाच - परीक्षा केंद्र दर्शवून उमेदवारांची नावे प्रवेशपत्र तयार करण्यासाठी

(अ) अ.क्र.१ बाबत दि. १६-६-२००८
(ब) अ.क्र. २ बाबत दि. २१-६-२००८
(क) अ.क्र. ३ बाबत दि. २३-६-२००८

सहा - ए.टी.सी. कडून प्रवेशपत्र वितरणाकरिता

(अ) अ.क्र. १ बाबत दि. १६-६-२००८ ते दि. २१-६-२००८
(ब) अ.क्र. २ बाबत दि. २१-६-२००८ ते दि. २७-६-२००८
(क) अ.क्र. ३ बाबत दि. २३-६-२००८ ते दि. २८-६-२००८

सात - कट ऑफ लिस्ट साठी

(अ) अ.क्र. १ करिता दि. २७-६-२००८
(ब) अ.क्र. २ करिता दि. ३-७-२००८
(क) अ.क्र. ३ करिता दि. ४-७-२००८

आठ - जिल्हा परिषदेने त्यांच्या पदांच्या जाहिरातीची प्रत, दुरुस्ती पत्र इ. च्या प्रती न चुकता महाराष्ट्र ज्ञान महामंडळाला पाठविणे आवश्यक आहे.